कृषि उन्नती योजनेंतर्गत (KY), कृषि विस्तार उप अभियानातंर्गत, राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेंतर्गत सन २०२६-२७ मध्ये तीन्ही प्रवर्गासाठी (सर्वसाधारण, अनु.जाती अनु.जमाती) दुसऱ्या हप्त्याचा एकूण रु. ६८००.०० लक्ष निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/३-अे,(ई-१६३५८९२)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २०२६

वाचा -

१. दि.१०.०३.२०२६ रोजी झालेली राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची (SLSC) बैठकीचे दि. ११.०३.२०२६ रोजीचे इतिवृत्त
२. केंद्र शासनाचे पत्र क्र. ०३/१४/२०२६-KY (E- १८६५५७) दिनांक: २२/०४/२०२६
३. संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.कृ आ/आत्मा/वाकृआ/प्रशा.मा/२६-२७/ ४१०/ २०२६, दि. २४ .०४.२०२६
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६
५. आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-६, दि. १३.०५.२०२६
६. कृषि विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र.एफ नं.१९(MH-१४), दि.२३.०४.२०२६
७. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/ती.हप्ता/४१६/२५, दि.२७.०४.२०२६
८. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/प.हप्ता/४१७/२५, दि.२७.०४.२०२६
९. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/प.हप्ता/४१८/२५, दि.२७.०४.२०२६
१०. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
११. कृषि व पदुम विभाग शा. नि. क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/३-अे, दि.११.०५.२०२६
१२. कृषि व पदुम विभाग शा. नि. क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/३-अे,(ई-१६३५८९२) दि.२२.०५.२०२६
१३. कृषि व पदुम विभाग शा. नि. क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.६४/३-अे,(ई-१६६९३०२) दि.२५.०५.२०२६
१४. केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.२४१ (MH१४) दिनांक: १०/०८/२०२६
१५. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/ती.हप्ता/९१९/२६, दि.१३.०८२०२६
१६. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/ती.हप्ता/९२०/२६, दि.१३.०८२०२६
१७. कृषि संचालक (आत्मा), यांचे पत्र जा.क्र.आत्मा/लेखा/पुराही/ती.हप्ता/९२१/२६, दि.१३.०८२०२६

प्रस्तावना -

केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजनेंतर्गत (KY), कृषि विस्तार उप अभियान राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानात राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांमध्ये सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या ६०:४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात राबविण्यात येते. सदर योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्यासाठी एकूण रु. १७०.०० कोटी रकमेचा आराखड्यास दि.११.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाने सन २०२६-२७ करिता आत्मा योजनेकरिता संदर्भ क्र. १४ येथील पत्रान्वये केंद्र हिश्याचा सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता रु. ४०८० लक्ष निधी वितरीत केला आहे, त्यानुषंगाने समरुप राज्य हिश्याचा एकूण रु.२७२०.०० लक्ष निधी उपलब्ध

करुन देण्याबाबतचा प्रस्ताव कृषि संचालक (आत्मा) यांनी संदर्भ क्र. १५, १६ व १७ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

त्यानुषंगाने सन २०२६-२७ करिता केंद्र पुरस्कृत राज्य कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करण्यासाठी सहाय्य उप अभियान (आत्मा) या योजने अंतर्गत तिन्ही प्रवर्गाकरीता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) दुसऱ्या हप्त्याकरिता केंद्र हिस्सा रु.४०८०.०० लक्ष व राज्य हिस्सा रु.२७२०.०० लक्ष असा एकूण रु.६८००.०० लक्ष इतका निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

१. सन २०२५-२६ करिता केंद्र पुरस्कृत राज्य कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करण्यासाठी सहाय्य उप अभियान (आत्मा) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी तिन्ही प्रवर्गाकरीता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) दुसऱ्या हप्त्यापोटी केंद्र हिस्सा रु. **४०८०.००** लक्ष (रूपये चाळीस कोटी ऐंशी लाख फक्त) व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. **२७२०.००** लक्ष (रूपये सत्तावीस कोटी वीस लक्ष फक्त) असा एकूण रू६८००.०० लक्ष (रूपये अडुसष्ट कोटी फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचा प्रवर्गनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

(रु. लाखात)

अ.क्र.	**बाब**	**सर्वसाधारण**	**अनु. जाती**	**अनु. जमाती**	**एकुण**
१.	केंद्र हिस्सा	३२१५.०४	४८१.४४	३८३.५२	४०८०.००
२.	राज्य हिस्सा	२१४३.३६	३२०.९६	२५५.६८	२७२०.००
	एकूण	५३५८.४०	८०२.४०	६३९.२०	**६८००.००**

२. सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२०२७ साठी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

प्रवर्ग	केंद्र हिस्सा (६० टक्के)	राज्य हिस्सा (४० टक्के)
सर्वसाधारण	मागणी क्र. - डी -०३ २४०१ - पीक संवर्धन (१०९) - विस्तार व शेतकरी प्रशिक्षण (०१) माहिती व प्रचार (०१) (४४) - कृषि उन्नती योजना -राज्य कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करण्याकरिता सहाय्य उपअभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कें.पु.यो.) (सर्वसाधारण) ३३-अर्थसहाय्य (२४०१४४४५)	मागणी क्र. - डी -०३ २४०१ - पीक संवर्धन (१०९) - विस्तार व शेतकरी प्रशिक्षण (०१) माहिती व प्रचार (०१) (४३) - कृषि उन्नती योजना -राज्य कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करण्याकरिता सहाय्य उपअभियान (राज्य हिस्सा ४० टक्के) (कें.पु.यो.) (सर्वसाधारण) ३३ - अर्थसहाय्य (२४०१४४३६)
अनुसूचित जाती	मागणी क्र. - एन -०३ २४०१ - पीक संवर्धन (००) (७८९)- अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना (०१) (२३) -कृषि उन्नती योजना- कृषि विस्तार अभियान- विस्तार विषयक कामांत सुधारणा करण्याकरिता राज्यांच्या विस्तार कार्यक्रमांना	मागणी क्र. - एन -०३ २४०१ - पीक संवर्धन (००) (७८९)-अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना (०१) (२४) - कृषि उन्नती योजना- कृषि विस्तार अभियान- विस्तार विषयक कामांत सुधारणा करण्याकरिता राज्यांच्या विस्तार कार्यक्रमांना

प्रवर्ग	केंद्र हिस्सा (६० टक्के)	राज्य हिस्सा (४० टक्के)
	सहाय्य (केंद्र हिस्सा ६० टक्के) (अनुसूचित जाती) (कें.पु.यो.) ३३-अर्थसहाय्य (२४०१B३०१)	सहाय्य (राज्य हिस्सा ४० टक्के) (अनुसूचित जाती) (कें.पु.यो.) ३३ -अर्थसहाय्य (२४०१B३१२)
अनुसूचित जमाती	मागणी क्र.टी - ५, २४०१- पीक संवर्धन ७९६- अनुसूचित जमाती उपयोजना (०१)- अनुसूचित जमाती क्षेत्राखालील उप योजनांतर्गत योजना (०१) (१७) कृषि उन्नती योजना - कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करण्याकरिता सहाय्य उपअभियान (केंद्र हिस्सा, ६० टक्के) (कें.पु.यो.) (अनुसूचित जमाती) ३३ अर्थसहाय्य (२४०१A५१२)	मागणी क्र.टी - ५, २४०१- पीक संवर्धन ७९६- अनुसूचित जमाती उपयोजना ०१- अनुसूचित जमाती क्षेत्राखालील उप योजनांतर्गत योजना (०१) (१८) कृषि उन्नती योजना-- कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करण्याकरिता सहाय्य उपअभियान (राज्य हिस्सा, ४० टक्के) (कें.पु.यो.) (अनुसूचित जमाती) ३३ अर्थसहाय्य (२४०१A५२१)

३. आत्मा योजनेकरीता प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणा-या निधीच्या मर्यादेत योजनेची अंमलबजावणी करावी.

४. आयुक्त (कृषि) यांनी या योजनेसाठी केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन योजनेंतर्गत उद्दिष्ट निहाय अंमलबजावणीच्या सविस्तर सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

५. सन २०२६-२७ मध्ये राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टिने, पुढील अधिकाऱ्यांना नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

अ.क्र.	**स्तर**	**नियंत्रण अधिकारी**	**आहरण व संवितरण अधिकारी**
१.	आयुक्तालय स्तर	आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे	सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.	जिल्हास्तर	संबंधित प्रकल्प संचालक, आत्मा	संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी.

६. सदर योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये वितरीत केलेल्या निधीचे लेखापरिक्षीत केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे (Audited Utilization Certificates) सत्वर सादर करावीत.

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं.-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल,२०२६, व आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-०६, दि.१३ मे, २०२६ आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक-बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२११७२२०६७९४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.08.21 17:23:00 +05'30'

(ग.सं.कचरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१. मा.मंत्री (कृषि), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. सचिव (कृषि), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि) तथा राज्य नोडल अधिकारी आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे
५. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे
६. सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आत्मा नियामक मंडळ (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
७. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष आत्मा नियामक मंडळ
१०. संचालक वनामती, नागपूर
११. उप संचालक, आत्मा, सामेती, पुणे
१२. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१४. सर्व प्रकल्प संचालक (आत्मा),
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६. कृषि विकास अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१८. महालेखापाल - १/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
१९. वित्त विभाग (का.व्यय-१) (अर्थसंकल्प-१२)(अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.३२
२०. नियोजन विभाग, कार्यासन - १४१४, १४३१, मंत्रालय, मुंबई.३२
२१. कार्यासन अधिकारी, २-अे, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवड नस्ती (कार्यासन-३अे)